# सुरक्षा रक्षक मंडळ
# बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा, सानपाडा, नवी मुंबई.

---

## सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या गणवेशाबाबत नियमावली

**सुरक्षा कर्मचाऱ्यांचा पदनिहाय गणवेश खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | पद | गणवेश साहित्य |
|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक (पुरुष व महिला) | १) खाकी रंगाचा गणेवश (पॅन्ट व शर्ट) - लोगोसहीत<br>२) निळया रंगाची टोपी- लोगोसहीत<br>३) काळया रंगाचा पट्टा,<br>४) खाकी रंगाचे सॉक्स,<br>५) काळे रंगाचे बुट,<br>६) शोल्डर बॅच,<br>७) निळया रंगाची दोरी (Blue Lineyard)<br>८) नेमप्लेट |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १) खाकी रंगाचा गणेवश (पॅन्ट व शर्ट)- लोगोसहीत<br>२) निळया रंगाची टोपी- लोगोसहीत<br>३) काळया रंगाचा पट्टा,<br>४) खाकी रंगाचे सॉक्स,<br>५) काळे रंगाचे बुट,<br>६) शोल्डर बॅच,<br>७) निळया रंगाची दोरी (Blue Lineyard)<br>८) निळया रंगाची सिंगल फित<br>९) नेमप्लेट |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १) खाकी रंगाचा गणेवश (पॅन्ट व शर्ट) - लोगोसहीत<br>२) निळया रंगाची पी कॅप - लोगोसहीत<br>३) कॅप बॅच,<br>४) काळया रंगाचा पट्टा,<br>५) खाकी रंगाचे सॉक्स,<br>६) काळे रंगाचे बुट,<br>७) शोल्डर बॅच,<br>८) निळया रंगाची दोरी (Blue Lineyard)<br>९) निळया रंगाची डबल फित<br>१०) नेमप्लेट |
| ४ | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | १) खाकी रंगाचा गणेवश (पॅन्ट व शर्ट) - लोगोसहीत<br>२) निळया रंगाची पी कॅप- लोगोसहीत<br>३) कॅप बॅच,<br>४) काळया रंगाचा पट्टा,<br>५) खाकी रंगाचे सॉक्स,<br>६) काळे रंगाचे बुट, |

| | | |
|---|---|---|
| | | ७) शोल्डर बॅच,<br>८) निळया रंगाची दोरी (Blue Lineyard)<br>९) खांदयावर १ स्टार बॅच<br>१०) नेमप्लेट |
| ५ | सुरक्षा अधिकारी | १) खाकी रंगाचा गणेवश (पॅन्ट व शर्ट) - लोगोसहीत<br>२) निळया रंगाची पी कॅप - लोगोसहीत<br>३) कॅप बॅच,<br>४) काळया रंगाचा पट्टा,<br>५) खाकी रंगाचे सॉक्स,<br>६) काळे रंगाचे बुट,<br>७) शोल्डर बॅच,<br>८) निळया रंगाची दोरी (Blue Lineyard)<br>९) खांदयावर २ स्टार बॅच<br>१०) नेमंप्लेट |
| ६ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १) खाकी रंगाचा गणेवश (पॅन्ट व शर्ट) - लोगोसहीत<br>२) निळया रंगाची पी कॅप - लोगोसहीत<br>३) कॅप बॅच,<br>४) काळया रंगाचा पट्टा,<br>५) खाकी रंगाचे सॉक्स,<br>६) काळे रंगाचे बुट,<br>७) शोल्डर बॅच,<br>८) निळया रंगाची दोरी (Blue Lineyard)<br>९) खांदयावर ३ स्टार बॅच<br>१०) नेमप्लेट |

१) मंडळाने विविध आस्थापनेत वितरीत केलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर पदनिहाय संपूर्ण गणवेशामध्ये हजर असणे बंधनकारक आहे.

२) सदर गणवेश हा स्वच्छ धुतलेला, तसेच इस्त्री केलेला व नीटनेटका असावा.

३) सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कर्तव्य कालावधी संपल्यानंतर मंडळाचा गणवेश परिधान करु नये, कर्तव्य संपल्यानंतर सार्वजनिक व खाजगी ठिकाणी मंडळाच्या गणवेशाचा वापर केल्याचे आढळल्यास सदर सुरक्षा रक्षक शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहे.

४) कर्तव्यावर असताना सुरक्षा कर्मचाऱ्यांनी गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. नागरी वेशामध्ये (Civil Dress) सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर हजर राहणे सर्वस्वी चुकीचे असून शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहे.

५) सर्व सुरक्षा कर्मचाऱ्यांनी पदाप्रमाणे फित व स्टार लावणे बंधनकारक आहे.

६) सर्व पुरुष सुरक्षा कर्मचारी यांनी स्वच्छ दाढी (Clean Shave) व केस बारिक असणे आवश्यक आहे.

७) सर्व महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी केसाचा आंबाडा बांधलेला असावा व त्यावर काळी जाळी घालणे बंधनकारक आहे. केस मोकळे सोडलेले नसावेत.

८) सुरक्षा कर्मचाऱ्यांचे बूट स्वच्छ व पॉलिश केलेले असावेत.

९) कर्तव्यावर हजर असताना सुरक्षा कर्मचाऱ्यांनी गणवेशावर नेमप्लेट लावणे बंधनकारक आहे.

१०) कर्तव्यावर हजर असताना सुरक्षा कर्मचाऱ्यांनी मंडळाचे ओळखपत्र गळयात घालावे.

११) गणवेशधारी सुरक्षा कर्मचाऱ्यांची कर्तव्यावर वागणूक सौजन्याची व जबाबदारीची असावी. सुरक्षा कर्मचारी कोणतेही उध्दट व अश्लाघ्य (लाजीरवाणे) वर्तन अथवा गैरवर्तन करणार नाही याची प्रत्येकाने खबरदारी घ्यावी.

१२) आपण परिधान केलेल्या गणवेशाचा सभ्यतेने व मान राखून कर्तव्य करावे.

१३) उपरोक्त नियमावलीचे सर्व सुरक्षा कर्मचारी यांनी भंग केल्यास त्यांच्यावर योजनेतील तरतुदीनूसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच इतर लागू असलेल्या कायदयानूसार कारवाईस पात्र राहतील.





नवीन गणवेश
**NEW UNIFORM**

जुना गणवेश
**OLD UNIFORM**



नवीन गणवेश

**NEW UNIFORM**



जुना गणवेश

**OLD UNIFORM**